वर्ष पहिले. अंक सातवा.
डिसेंबर २०१२



साहित्य प्रतिष्ठान

इत्यर्थ
वर्ष पहिले अंक सातवा
डिसेंबर २०१२

संपादक मंडळ
नाम गुम जायेगा: ठाणे
सृजा: औरंगाबाद
तनवीर सिद्दिकी : छत्तीसगढ

इत्यर्थ हे मुक्तपीठ आहे. यात व्यक्त केलेली मते लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही

©लेखनाचे सर्व हक्क लेखकांकडे सुरक्षित. प्रकाशनाचे सर्व हक्क ई-साहित्य प्रतिष्ठानकडे सुरक्षित. या पुस्तकाच्या कोणत्याही भागाचा उपयोग किंवा पुअनर्मुद्रण करण्याआधी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवष्यक आहे.

संपर्क : ईसाहित्य प्रतिष्ठान
जी ११०२
अकरावा मजला
ईटर्निटी
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे
ठाणे
४००६०४

मो: ९८६९६७४८२०

वेबसाईट: www.esahity.com/
etyarth.blogspot.in
ईमेल: etyarth.esahity@gmail.com
esahity@gmail.com

आपली माणसं जगभर पसरलेली आहेत. “आजच्या डिजिटल युगात जग लहान झलंय खूप” हे वाक्यं आता अगदीच घिसंपिटं झालेलं असलं तरीही शंभर टक्के खरं आहे. पहाटेच्या स्वप्नातल्या किरणासारखं सारं जग आपल्या मुठीत बंद होऊ पाहतंय आणि आपल्याला स्वातंत्र्यही मिळतंय. आपली जादूई पोतडी त्या जगाच्या अगम्य खोलीतून अलगद बाहेर काढून घेण्याचंही. अभिव्यक्ती स्वातंत्र्य या संकल्पनेचे आयामही बदलले आहेत..

पण आपण आजही तेच आहोत.
संवेदना आजही त्याच आहेत.
अभिव्यक्ती स्वातंत्र्य बदललं असेल कदाचित
पण अभिव्यक्ती तीच आहे.

शब्द.. अर्थ.. प्रमाण.. परिमाण.. तेच तेच आहे..

इत्यर्थचा हा डिसेंबर अंक अंगणवाडीपासून अमेरिकेपर्यंतच्या अभिव्यक्तीचा आहे.

रसिकांनी आपला मानून घ्यावा.

सृजा
इत्यर्थ संपादक मंडळ

# आठवणी विसरण्याच्या

मृण्मयी हर्षल भजक

कलाकार मंडळी विशेषतः लेखक,कवी मंडळी म्हणजे एकदम हरहुन्नरी माणसं! तुमच्या माझ्यासारखी. काहीतरी कलात्मक करणारी, लिहिणारी, वाचणारी, वाचता-लिहिताना हरवून जाणारी. आणि या हरवण्यामध्ये विसरून जाणारी! असं असलं तरी 'विसरभोळेपणा' ही काही कोण्या एका वर्गाची मक्तेदारी नव्हे. बऱ्याचदा प्राध्यापक, कवी, लेखक यांच्यावरच त्याचा मक्ता लादला जातो. पण तेही खरं नाही. सोदाहरणच सांगते.

आम्ही राहत असलेल्या इमारतीत ,खालच्या मजल्यावर एक मोठं कुटुंब राहत असे. त्यांच्यापैकी कुणीही वरील वर्गात मोडत नव्हतं. त्यांचं आडनावही विसरभोळे वगैरे नव्हतं. पण त्यांच्या घरी गेलं की विसरण्याचे एक एक भारी किस्से ऐकायला मिळत. त्यांचं कुटुंब म्हणजे, नवरा बायको आणि त्यांची एकापेक्षा एक व्रात्य चार मुलं. एकदा, कधी नव्हे ते सगळेजण एकत्र बाहेर फिरायला गेले. आणि घरी आल्यावर लक्षात आलं, "अरेच्या,धाकटी विसरली की तिकडेच!" काहीबाही विसरण्याच्या अनेक आठवणींचं गाठोडं आहेच गाठीला, त्यातल्या पण काही विसरून जातात बघा.आता बस मध्ये छत्री विसरली, भाजीला मीठ विसरलं या तर अगदी चिल्लर आठवणी आहेत. खरंतर आठवणी नव्हेतच त्या. कारण त्या कधी भूतकाळात जमाच होत नाहीत. चालूच राहतात.

आठवणी म्हणजे कशा एकदम भक्कम पाहिजेत. तर अशाच काही आठवणी.

आमचं लग्न होऊन काही महिनेच झाले होते. अचानक एखादी गोष्ट मनात यावी आणि जास्त विचार न करता ती करून टाकावी असे ते दिवस होते. एके दिवशी रात्रीच्या जेवणानंतर मनात आलं, सिनेमाला जायचं. मग काय, लगेच काढली बाईक! सिनेमाला थोडाच वेळ राहिला होता. पण नवऱ्याला एक महत्वाचं मेल करायचं होतं, म्हणून मग सायबर कॅफे मध्ये गेलो. काम दोनच मिनिटांचं होतं. पटकन झालं, आणि घाईतच आम्ही सिनेमाला गेलो. सिनेमा मस्तच होता. रात्री दीडच्या सुमारास दोघं घरी परतलो. घराच्या दाराशी आलो. दार उघडण्यासाठी किल्ली... किल्ली? किल्ली? जाताना मीच दार बंद केलं होतं. पर्स पण घेतली नव्हती. म्हणजे किल्ली माझ्या हातातच होती. आणि ती... ती.....सायबर कॅफे मध्ये विसरली गेली होती. रात्री दीड वाजता अर्थातच सायबर कॅफे बंद होतं.

आमचं घर सहाव्या आणि सुदैवाने शेवटच्या मजल्यावर होतं. सुदैवाने आमच्या घराला मोठी बाल्कनी होती, सुदैवाने बाल्कनीला पत्रा लावायचं काम लांबणीवर पडलं होतं. सुदैवाने बाल्कनीचे ग्रील जाताना लावले नव्हते आणि सुदैवाने दाराला बाहेरून कुलूप लावलं नव्हतं. (विसरणाऱ्या माणसांना दैव बघा कसं सोबत करीत असतं.) नवऱ्याने बिल्डिंग च्या टेरेस वरून आमच्या बाल्कनीत उडी मारली, काहीतरी खड्खुड करून बाल्कनीचं दार उघडलं,आणि मी मध्यरात्री अडीचच्या सुमारास मुख्य दारातून गृहप्रवेश केला.

पुण्यात लक्ष्मी रोड किंवा तुळशी बागेत गेल्यावर, दोन पिशव्या भरून सामान आणल्यावर लक्षात येतं की आपण ज्या वस्तूसाठी तिथे गेलो होतो, ती वस्तू विसरलीच की! आता हे झालं सार्वजनिक विसरणं, पण काहींचं व्यक्तिगत विसराण्यातही जणू पेटंटच असतं. माझी एक मैत्रीण परीक्षेचा इतका ताण घ्यायची की बऱ्याचदा पेपरच्या दिवशी वेगळ्याच विषयाचा अभ्यास करून यायची. एरवी तोंडपाठ असणारी उत्तरं नेमकी तोंडी परीक्षेच्या वेळी विसरणारेही खूप जण असतात. (कर्णाला होता तसा कोणताही शाप नसताना!)

एकदा एका नाटकाच्या वेळी मी आणि माझा सहकलाकार दोघेच स्टेजवर असं दृश्य होतं. माझं एक मोठं १०-१२ वाक्याचं बोलणंच मी विसरले. विसरले ते विसरले, वर मी माझे संवाद विसरले आहे हे देखील विसरले. (विसरणाऱ्या माणसांची हीच खासियत असते.) आणि माझा सहकलाकार संवाद विसरला कसा असा विचार करून त्यालाच मनातल्या मनात दोष देऊ लागले. त्याने तत्परतेने बनविलेल्या नवीन संवादाने एक मोठा विसंवाद टळला. कॉलेजच्या नाटकात तर विसरण्याची धमालच असते. सामान विसरलं,सरावाची वेळ विसरली, मूव्ह विसरली, आणि संवाद तर काय हक्काने विसरण्याचीच गोष्ट.

एकदा आम्ही चारपाच जण सहलीला निघालो होतो. चार दिवसांचा मुक्काम होता. सामान भरपूर झालं होतं. कपडे खाणं यांच्या बॅगा खचाखच भरल्या होत्या. निघेपर्यंत नवीन नवीन गोष्टी आठवतच होत्या. शेवटी एकदाचे आम्ही घरातून बाहेर पडलो. प्रवासात सुरवातीचा अर्धा तास काही विसरलं नाही ना हे आठवण्यातच गेला. म्हणजे घरातले दिवे, पंखे, नळ, शेगडी, दारं वगैरे वगैरे हळूहळू मनाची गाडी प्रवासाच्या गाडीच्या रुळावर आली. बघता बघता प्रवास मजेत संपला. आम्ही हॉटेल मध्ये उतरलो. सामान रुममध्ये आलं. आता आवरून घ्यावं म्हणून बॅगा उघडल्या गेल्या. आणि लक्षात आलं, दोन बॅगा इथे नाहीतच. सगळीकडे शोधाशोध केली,

शेवटी आपापल्या स्मृतीला ताण देत, संदर्भ आठवत, आम्हा सगळ्यांचा एकमत झालं की बॅगा घरी हॉलमध्ये सोफ्याच्या मागे ठेवल्या होत्या, त्या तिथेच राहिल्या. सहलीला येताना भरून ठेवलेल्या बॅगा विसरणं हा एक नवीन विक्रमच होता

एखादया नवीन ठिकाणी जाताना पूर्ण पत्ता घ्यायला विसरणे किंवा सामान आणायला जाताना यादी विसरणे अशा गोष्टीही होत असतात अधून मधून. पण त्यातूनही मी नेहमी सही सलामत सुटते. जाण्याच्या ठिकाणाचं नाव आणि स्टेशन माहित असलं की लोकांना विचारात (निदान मुंबईत तरी )तुम्ही त्या ठिकाणी सहज पोहोचू शकता. याचा अनुभव मी बऱ्याचदा घेतला आहे. आणि सामानाच्या यादीचं म्हणाल, तर जरा स्मरण शक्तीला ताण दिला की एक दोन वगळता ती पण आठवते.

एका विसरण्याला मात्र मी मनापासून घाबरते ते म्हणजे माणसांना विसरणं (एकतर्फी). कारण यामध्ये लढा समोरासमोर असतो, आणि आपण लढतोय हे समोरच्याला कळूही दयायचा नसतं. विसरण्याच्या अशा अनेक विखुरलेल्या आठवणी माझ्याजवळ आहेत. तुमच्याकडेही असतील. काहीजणांकडे मात्र नसतात अशा आठवणी. अशा लोकांचा हेवा करावा का आदर करावा या बाबत सध्या मी गहन विचार करित आहे. त्यामुळे इथेच थांबते नाहीतर माझे मौल्यवान विचार मी विसरून जाईन.

drmrunmayeeb@gmail.com

# ढ मुलांचे हुश्शार बाप

विजय तरवडे

नागजंपीचा मुलगा दहावीच्या युनिट टेस्टमध्ये गणितात काठावर पास झाला होता. आपला मुलगा इंजिनिअर होईल अशी स्वप्नं बघणारे आई-वडील दोघे भडकले होते. अशा वेळी नेहमी होतं तेच झालं. नागजंपीनं विश्वामित्राची पोज घेतली नि मुलादेखत मुलाच्या आईवर – अर्थात नंदूवहिनीवर – पहिला हल्ला चढवला.
“तू स्वतःच्या मुलाला चांगलं संस्कार दिलं नाही. शिस्त लावलं नाही. आता ते गणितात असं दिवा लावलं.”

“मुलगा माझं एकट्याचं का?” वहिनीचा मिळमिळीत बचाव.

“एकट्याचं? त्याचं आई कोण? तू का मी? नऊ महिने तुझ्या पोटात वाढलं. रोज जास्तीत जास्त वेळ तुझ्या जवळ असतं का माझ्या जवळ असतं?” भ्रष्टाचाराचा विषय निघाला की भाजपवाले कसे एकच मुद्दा लावून धरतात. जास्तीत जास्त वेळ सत्तेवर कोण होतं, कॉंग्रेस की भाजप?

“पण त्याला हॉटेलमध्ये सिनेमा बघायला, ट्रीपला जायला, नवीन कपडे घालायला, मोबाईल फोन घ्यायला, मोटरसायकल घ्यायला पैसे तुम्हीच दिलं.”

“त्याला फी भरायला मीच पैसे दिलं की. कोचिंग क्लास मीच लावलं की. घरी बसून अभ्यास करायला नवीन कंप्युटर आणिक इंटरनेटसाठी मीच पैसे दिलं की. तुझ्यावर डोळे झाकून विश्वास ठेवलं आणि मागितलं तेवढं पैसे दिलं. पण काय उपयोग झालं? तुझं संस्कार कमी पडलं. रामचंद्रा रे...”

“अप्पा,” मुलानं मध्ये बोलायचा प्रयत्न केला.

“चूप. नालायक. तू म्हणजे आमच्या घराण्यातला जलसिंचन खाता निघालं रे. फुल्ली युसलेस. गेली दहा वर्षापासून मी एवढं निधी मास्तरांना दिलं. तुला दिलं. तुझ्या मेंदूतला अर्धा टक्का मेंदू पण बुद्धीच्या ओलिताखाली आलं नाय.”

“अप्पा, शाळेतले मास्तर कॅगवाल्यांसारखेच बेभरवशी आहेत. त्यांच्या मार्कलिस्टवर विश्वास ठेवू नका.” “चूप. जास्त बोलू नकोस रे.” “अप्पा, डोंट वरी. बारावीच्या परिक्षेला अजून वेळ आहे. दोन हजार चौदा साली मी बरोबर दाखवतो.”

“आणिक बारावीला पण हेच झालं तर काय करशील?”

“मी एनजीओ काढीन. खूप खूप पैसे मिळवीन. मग अप्पा, आणि अम्मा, तुम्ही दोघं नुसतं आराम करा. मी मोठा बंगला घेईन. कार घेईन. कामाला नोकर ठेवीन. तुम्हाला सुखात ठेवीन.”

“शहाणा माझा बाळ.” नंदूवहिनी बाळाला जवळ घेत बोलली. नाग्यानं कपाळावर हात मारून घेतला.

*

नागजंपीच्या मुलानं गणितात दिवे लावले. त्याच वेळी आमचा दुसरा दोस्त हरिदासच्या मुलानं मात्र गणितात १५० पैकी १३८ मार्क्स पटकावले होते. इंग्रजीत १०० पैकी ८७ मार्क्स मिळवले होते. त्यामुळं त्या बिचाऱ्याला वाटलं की आपला बाप आपल्यावर खुष होईल. पण तिथं वेगळाच प्रकार घडला. हरिदास घरी आला, कपडे बदलले, पंखा लावून टीव्ही समोर बसला. मुलानं त्याला गुणपत्रिका दाखवली.

“काय आहे?”

“मला गणितात १५० पैकी १३८ आणि इंग्रजीत १०० पैकी ८७ मार्क्स मिळाले.” “मग काय आभाळाला हात टेकले का तुझे? अगं ए, बाहेर ये.” “काय झालं?” पदराला हात पुसत अर्धांगिनी आली. “उद्यापासून याची शाळा बंद. शेजारच्या नितिन ड्रायव्हिंग स्कूलमध्ये त्याचं नाव घातलंय. ए शुंभा, ऐकतोयस ना? उद्यापासून त्या स्कूलमध्ये तुला कार, टेम्पो आणि ट्रक चालवायला शिकायचंय.”

“अगं बाई, हे काय नवीन खूळ? पोरानं एवढे चांगले मार्क मिळवलेत. त्याला काय ड्रायव्हर करायचंय की काय?”

“बायकांची अक्कल चुलीपुढं म्हणतात ते उगीच नाही. अगं दुपारच्या वेळी तू त्या निर्बुध्द मालिका बघतेस, त्यापेक्षा चार बातमीपत्रं पाहत जा. म्हणजे असे गाढव प्रश्न तुझ्या मनात येणार नाहीत. अगो एकेकाळी इंग्रजी वाघिणीचं दूध असेल. आता मात्र विविध गाड्या चालवता येणं हे सिंहिणीचं दूध ठरलंय. आहेस कुठं? आजकाल वेगवेगळ्या राजकीय नेत्यांच्या पदरी असलेले ड्रायव्हर्स हेच विविध कंपन्यांचे संचालक किंवा व्हाईस प्रेसिडेंट होतात. काय, समजलीस काय?”

“ऐकावं ते नवलच.”

“हे तर काहीच नाही. एकेकाळी मुली प्रेमात पडून प्रियकराबरोबर पळून गेल्या तर लोक म्हणायचे की मुलीनं नाक कापलं. अजूनही तसंच म्हणतात. पण आता काळ बदललाय. मुलगी एखाद्या नेत्याच्या ड्रायव्हरबरोबर पळून गेली तर म्हणतात की पोरीनं नशीब काढलं. मला देखील वाटतं. आपला बाब्या एखाद्या खूप मोठ्या नेत्याचा ड्रायव्हर व्हावा. नंतर कंपनीचा संचालक किंवा व्हाईस प्रेसिडेंट व्हावा आणि छान श्रीमंत घराण्यातली मुलगी त्याला सांगून किंवा पळून यावी.”

हरिदासनं भाववश होत बनियनला डोळे पुसले.हरिदासचा मुलगा सध्या नितिन ड्रायव्हिंग स्कूलमध्ये जातो. नागजंपीचा मुलगा पूर्तो ड्रायव्हिंग स्कूलमध्ये जातो. दोघांची स्वप्ने खरी होवोत.

# “डायलॉग”

संदीप भागवत

कसाब नरकाच्या दरवाज्यात पोचला तेव्हा त्याचं स्वागत करायला त्याची ९ जणांची पूर्ण टीम हजर होती. गळाभेट करताना कसाबला तेव्हा खूप वेदना झाल्या

कसाब : देराभाई, आस्ते यार, अभीतक गर्दनमें दर्द है | जरा सम्भालके|

देरा खान : सॉरी बॉस्, बहोत दिनोंके बाद मिलना हुआ, तो रहा नही गया|
जावेद : सलाम भाई| आनेमें बहूत देर लगा दी यार|
कसाब : काय करु ते साले हिन्दुस्तानी सोडतच नव्हते. तुम्ही मला एकट्याला सोडून इथे निघून आलात. पण बघितलंत नां! खुदाके घरमें देर है, अंधेर नही| चार वर्षे मस्त पृथ्वीवरल्या स्वर्गात लोळत पडलो होतो.
शोएब : काय बोलतोस काय्?
कसाब : मग्? खोटं् वाटतय की काय्? ९० दिवस पुर्ण होईपर्यंत जाम त्रास दिला साल्यांनी. कबुली दिल्या नंतर तरी शांत बसावं की नाही? तर येडे पाकिस्तान कडे शहानिशा करत बसले. कोर्टाचा निकाल येईपर्यंतच 2 वर्षे गेली. ऱोज साले कोर्टात न्यायचे/ परत आणायचे. सारखे तेच तेच प्रश्न्. मला वाटलं् होतं् की आपल्या पैकी कोणीतरी भेटेल पण हळू हळू कळलं की तुम्ही सर्वजण इथे आलात.
फहादुल्लाह : ए! पळून नाय आलो यार, बहोत ट्राय किया भागनेका, पर कमिनोंने ठोक डाला साला| अपने भाई लोगोंनेच अपनेको फसाया यार| आपल्याला रोज नमाज पढताना सांगायचे, की ये धरम का काम है, ये काम करनेपर आपको जन्नत मिलेगी, पण कसलं काय्, इथे हिसाब किताब झाल्यावर कळलं की, हे जे आपण सर्व केलं ते पाप होतं आणि आपली रवानगी आता नरकात झाली आहे. पूर्वी पैसे नव्हते मजा करायला. काम केल्यावर पैसे मिळणार. मग कुठलही काम करायची तयारी ठेवली. साली, फुल जान लावली एक लाख रुपयांसाठी. आपण जर मेलो तर ते पैसे आपल्या कुटुंबियांना मिळणार होते. कोणांस ठाऊक ते दिले की नाही. पण मजा मात्र राहूनच गेली यार्|
कसाब : पण आपल्याला काही गम नाही हं. आपुनने बहुत मजा किया| अरे तुम्हाला माहितीसाठी सांगतो, माझ्या दिमतीला झेड प्लस सिक्युरिटी होती काल पर्यंत. रोज वेगवेगळ्या ठिकाणांहून माझं जेवण येत असे. स्पेशिअल रूम. हां, फर्निश्ड नव्हती, पण चलता है| दोनवेळा आजारी पडलो तेव्हातर काय विचारू नका. ही सरबराई होती.

आपल्या देशात जर कोणी असं कृत्य केलं असतं तर कोर्टापर्यंत न्यायचीही कोणी तसदी घेतली नसती. ठेचून मारलं असतं त्याला. अर्थात हे ही खरंच की हे असं घाणेरडं कृत्य करणार कोण? चोराच्या घरात कोणी चोरी करतं का? असे उद्योग आपणच दुसरीकडे करतो मग आपल्या वाटेला कोण जाणार? काय?

देरा खान : सही बोला यार तू| ठीक है| आगे बोल|

कसाब : आगे क्या? ४ साल कैसे कटे पताही नही चला| अजूनही राहिलो असतो त्या स्वर्गात, पण

एब : काय झालं भाई? कुछ प्रॉब्लेम हुआ क्या?

कसाब : वहाँ करेगा कौन प्रॉब्लेम? जो पर्यंत नाकातोंडात पाणी जात नाही तो पर्यंत हात-पाय सुद्धा हलवत नाहीत. इथली जनता इतकी सहिष्णु आहे की विचारू नकोस. देशाच्या पंतप्रधानांची/ आपल्या पतिची हत्या करणाऱ्या आरोपी बाईची फाशी रद्द करण्यासाठी विनंती करणारी व्यक्ति इथे आहे, माहित्येय?

फहादुल्लाह : क्या बात कर रहा है? कौन है बे वो?

कसाब : उसकी बिवी!

फहादुल्लाह : किसकी?

कसाब : उस पी.एम.की|

देरा खान : काय बोलतोस काय?

कसाब : कसम से यार| येडे लोग रहते है यहाँ | बोलते है, प्यारसे जितेंगे सबको|

हफिझ : हमको क्या चु.... समझ रहा है रे| तेरे पहले यहाँ आए, इसका मतलब ये नही, के तू कुछभी फाडे और हम सुने|

कसाब : सही बोलता है भाई| अरे ये तो इनके हिस्ट्रीमेंसे चलते आ रहा है| बघ ना? गांधी पण असेच होते ना?

देरा खान : अरे असा एखादा डिफेक्टिव पीस मिळतो, म्हणून काय सगळे तसेच नसतात. परवा आम्ही सगळे स्वर्गात साफ-सफाई करायला गेलो होतो. उसी दिन से वहाँपर ठाकूर नाम की एक बुजुर्ग व्यक्ती आई है|

फहादुल्लाह : आम्ही त्यांना बोलताना ऐकला तेव्हाच आम्हाला कळलं होतं की, कसाब भाई का टाईम आ गया है|

शोएब : क्या चलती है बाबाकी| परसों तेरे बारेमें बोला – आज तू उपर|
कसाब : एक कानके नीचे बजाऊंगा ना सालो तुम सबको!
फहादुल्लाह : भाई, गुस्सा कायको हो रहा है|
कसाब : फिर क्या पप्पी लूं क्या तुम्हारी? अरे ठाकुर नहीं, ठाकरे साहब नाम है उनका| बहोत नाम है उनका मुम्बईमें| सिर्फ उधर ही नही अपने कंट्रीमेंभी पब्लिक डरती है उनसे| क्रिकेट टीमसे लेकर आर्टिस्ट तक सभी उनसे रिस्पेक्टसे बात करते है, समझे उन्होंने क्या किया बोला तू?
शोएब : चुप बे फहाद, पुरी बात बताएगा तो कसाब छोडेगा नही तेरेको| चुप बैठ|
कसाब : क्या चुप बैठ? बता मेरेको सब|
फहादुल्लाह : कुछ नही गुरु, गलती हो गई| माफ कर| अरे हां बॉस्, एक बात तेरेको पुछना ही भूल गया| अपने गुरु का क्या हो गया?
कसाब : कौन गुरु?
देरा खान : अरे यार, अफजल भाई| त्याचं काय झालं?
कसाब : तुम लोग टॉपिक बदली मत करो, पहले मेरेको पूरी बात बताओ|
देरा खान : कायकी बात्?
कसाब : बालासाहब की| वो आदमीकी वजहसे तो मेरेको बहोत तकलिफ हुई है, समझे?
शोएब : वो कैसे?
कसाब : अरे, ना हिन्दुस्तान के नये राष्ट्रपति, बालासाहब से समर्थन मांगते और ना मैं फांसी चढता|
फहादुल्लाह : मतलब?
कसाब : अरे, ये बालासाहब वहीं जनाब है जिन्होंने मेरे और गुरुके फांसीके बदले में, नये राष्ट्रपति के समर्थन में मतदान किया है| ये़ हिन्दुस्तानी जबान के पक्के होने की वजह से राष्ट्रपति ने भी अपना वचन निभाया| मुझे फाँसी लगाकर उन्होंने आधा वचन पूरा किया है और थोडेही दिनोंमे बचा हुआ आधा वचन पुरा हो जाएगा| ये बालासाहब का देहांत नही होता था, तो मैं, और थोडे दिनोंतक फांसीकी कतार में खडा हो सकता था| अबे, मेरा नंबर तो अफजल गुरुके बाद था| साथमें लंबी लिस्ट थी| ये बालासाहब की वजहसेही मेरी प्री-मॅचुअर डेथ हुई है|
तेवढ्यात नरकाच्या दरवाज्याची बेल वाजली.
चित्रगुप्ताचा आवाज कानी पडला! " अरे कोण आहे रे तिकडे? जरा त्या अफजल गुरु ला आत घेऊन त्याला आणि कसाबला नरकाचे संडास - बाथरूम साफ करायला लावा आणि स्वर्गात  बाळासाहेबांना सांगा, “काळजी करू नका, तुम्हाला दिलेले शब्द पाळायला सुरुवातझाली आहे ”.

sandeepbhagwat62@gmail.com

# नाटक करायचे नाटक

मिंट्स

मी नाटक करण्याबद्दल लिहिणे म्हणजे एक मोठी गंमतच आहे. मी स्वत:आयुष्यात एकदाच फक्त स्टेजवर उभी राहिलेय ते देखील मी ३री-४थी मधे असताना कोणत्यातरी नाटकात. आम्ही सुंदर, सुबक वगैरे नसल्याने तसे प्रसंग कमीच आले शाळेत असताना. सर्वांनी मिळून करण्याचे नाटक वगैरे आमच्या शाळेतल्या बाई कधी करत नसत. पण एकुणच आमच्यावेळी शाळेत फेवरिझम बराच असे त्यामुळे हे नाटकात काम करणे वगैरे माझ्यासाठी अस्तित्वातच नव्हते. पण नाटकासाठी मदत मात्र केलेली आहे बरेचदा. आणि तो संपूर्ण प्रवास नीट अनुभवला अनेकवेळा. एका मैत्रिणीने सल्ला दिला की तुझे अनुभव शेअर कर, मजा वाटेल वाचायला म्हणून हा लेखप्रपंच.

मला नाटकासाठी मदत करायची पहिली संधी सातवीमधे मिळाली. लहान मुलींचे मेकप करणे, ड्रेसेसची तयारी वगैरे हे असे सगळे करून दिले. पुढे कधी केले की नाही ते आठवत नाही. १९९९मधे मी भारतातून इकडे आले आणि माझ्या काकूमुळे मला ९९च्या सॅनहोजे येथे होणाऱ्या बीएमएममधे ‘खेळ मांडीयेला’ या अतिशय सुंदर कार्यक्रमाला मदत करायची संधी मिळाली. त्यावेळी खूप तालमींना जात असे. हे सगळे हौशी कलाकार. प्रत्येकजण नोकरी, काम, घर, शिक्षण सांभाळून वेळेवर तालमीना येत असत. प्रत्येकाच्या काही ना काही अडचणी असत पण तरीही लोक घरचे कार्य असल्यासारखे येत. या कार्यक्रमांची अजून एक मजा म्हणजे या कार्यक्रमात काम करणाऱ्यांनादेखील संपूर्ण तिकिट काढावे लागते (तेव्हातरी लागले होते). तरी सगळे हौसेने करत असत. पण माझा सहभाग अगदी नगण्य होता. साधारण ४०-४५ कलावंताचा ताफा होता. मेकप करणे, साड्या नेसायला मदत करणे, हेअरस्टाईल करणे वगैरे भरपूर कामे होती जी वॉलंटियर्सनी वाटून घेतली होती. काहींचे ६०-६५ सेकंदात ड्रेस चेंज वगैरे पण होते. पण करायला एकूणातच मजा आली.

पुढे अजून १-२ कार्यक्रमांना फुटकळ मदत केली पण कॉलेज व नोकरी यात सगळे मागेच पडले. पुढची संधी मिळाली ती म्हणजे 'तरुण तुर्क म्हातारे अर्क' केले तेव्हा. ते म्हणजे आमचे घरचे कार्य. माझ्या नवऱ्याने दिग्दर्शित केले होते. तेव्हा तालमींचे गणित पहिल्यांदा कळले. त्या तालमी आमच्याच घरी होत. शनिवारी आणि रविवारी सकाळी ७-१० या वेळात. सुरुवातीला नुसतेच वाचन, पात्रे पक्की करणे, त्यानंतर मग एकेक प्रवेश उभ्याने करणे, बरोबरीने पात्रांचे पाठांतर चालूच असते

हे सगळे पूर्णपणे हौशी कलाकार. काही लोकाना देशात किंवा इथे आल्यावर नाटकात/ एकांकिकांमधे काम केल्याचा थोडाबहुत अनुभव असतो. पण सगळे अगदी मनापासून कष्ट करत असतात. ऑफिसची कामे, विकेंडची घरची कामे, पाहुणे, इतर सोशल कमिटमेंट्स हे सगळे सांभाळत तालमी करायच्या म्हणजे खायच्या बाता नव्हेत. काही काही कलाकार तर एकेकवेळा ३०-४० मैलाचा प्रवास करुन तालमींसाठी येतात. त्यातच ऐनवेळी ऑफिसमधे काहीतरी उपटणे, घरची आजारपणे अशी विघ्ने येतात या सगळ्यावर मात करुन सतत ५-६ महिने तालमी करणे सोपे नसते. ही सगळी तारेवरची कसरत सांभाळत कलाकार आणि दिग्दर्शक काम करत असतात. दरम्यान नाटककाराकडून प्रयोगांसाठी परवानगी घेण्यात येते. प्रयोगाच्या साधारण २ महिने आधी बाकीचे तंत्रज्ञ या टीमला येऊन मिळतात. त्यात निर्माता, प्रकाश, संगीत, कपडेपट, मेकप, आणि सगळ्यात महत्वाचा म्हणजे सेट.

सेटसाठीचे सामान गोळा करणे ही एक कसरत निर्माता आणि दिग्दर्शक पार पाडतात. नविन काही बनवायचे आहे जसे दारे खिडक्या तर ते कमी पैशात कसे बनवता येईल ते पहाणे वगैरे येते. नाटकासाठी हॉल मिळवणे, बसण्याची व्यवस्था, संगीत आणि प्रकाश देणारे इक्विपमेंट्स नीट काम करत आहेत का? वगैरे सगळे जाऊन पहावे लागते. ते काम मुख्यतः निर्माता बघतो. नाटक २-३ अंकी असेल तर कधी कधी सहाय्यक दिग्दर्शक असू शकतो. मग तालमीच्या वेळा, ठिकाणे, कोणाकोणाची तालीम आहे हे सगळे तो इमेलमधे पाठवतो. 'तरूण तुर्क' साठी सहाय्यक दिग्दर्शक नव्हता मग ते सगळे काम दिग्दर्शकानेच केले. नाटकातील पात्रांच्या व्यक्तिरेखेप्रमाणे कपडेपट ठरवणे. आपापसात कोणाकडे नसेल तर मित्र-मैत्रिणींकडे चौकशी करुन ते मिळवणे. अगदी लहान लहान गोष्टी ज्या भारतात गृहित धरल्या जातात त्यासाठी इथे प्रचंड आटापिटा करावा लागतो. अगदी सोपे उदाहरण द्यायचे झाले तर नाटकासाठी अगदी साधी घरी वापरण्याजोगी अशी साडी हवी आहे तर भारतात दुकानात जाऊन आणणे सहजी शक्य असते पण ते इथे कुणाकडे आहे का हे बघत फिरावे लागते. नऊवारी साड्या वगैरे लागणार असतील तर मग त्या कोणाकडे आहेत का? की भारतातून मागवाव्या लागतील? भारतातून प्रॉप्स आणायचे असतील तर मग कोण जाणारे येणारे आहे का शोधणे.

भारतात फोन करुन नातेवाईकांना ते प्रॉप्स विकत घेण्यासाठी. कोणाकडे नेऊन देण्यासाठी तगादे लावणे हे देखील करावे लागते. बहिणाबाई चौधरी यांच्या कवितांवर आधारीत कार्यक्रम केला तेव्हा विहीर, जाते असे आम्ही घरी बनवले होते एका मैत्रिणीने आणि मी मिळून.

आता तालमींना रंग भरायला लागलेला असतो. मग हळूहळू लक्षात येते की अजून तालमींची गरज आहे, अशावेळी ऑफिस संपल्यावर तालमी होतात. रात्री साधारण ७-७.३० ते १०-१०.३० अशा तालमी चालतात. शेवटच्या २-३ महिन्यात प्रॉपर्टी (सेटचे सामान),संगीत यासह तालमी करण्यावर भर असतो. मग एक दिवस रंगीत तालीम ठरते. त्यासाठी एखादया लायब्ररीचा कम्युनिटी हॉल किंवा एखादया अपार्टमेंट कॉम्प्लेक्सचा हॉल असे काहितरी ठरवले जाते. मग सेट, संगीत, प्रकाशयोजना, वेषभूषेसह एक किंवा दोन तालमी केल्या जातात. चुकले तरी पुढे जात या तालमी होतात. मग कलाकारांची मिटींग होते. त्यात स्वतःचे काय चुकले, काय बदल करता येतील ते ठरवले जाते. संपूर्ण +ve /-ve फीडबॅक यावेळी दिला जातो. दिग्दर्शक हे नोंदवून घेतो आणि मग पुढील तालमींमधे ते बदल केले जातात.

आता नाटकाचा दिवस जवळ येऊन ठेपतो. आदल्या दिवशी एखादी चक्री घेउन कलाकरांना विश्रांती घेण्यास सांगितले जाते. पडदयामागच्या कलाकारांची मिटिंग होते. कॉम वर कोण असेल, कोणी कोणत्या कलाकाराला मदत करायची, कोणी सेट बदलायला मदत करायची, कोणी कपडेपट सांभाळायचा हे सगळे पक्के केले जाते. याच दरम्यात प्रयोगाच्या दिवशीचे वेळापत्रक ठरवले जाते. थिएटरवर किती वेळा जमायचे, जेवणाची सोय कोण किती वाजता करणार, पाणी, खडीसाखर वगैरेची व्यवस्था केली जाते.

नाटकाच्या दिवशी आधी स्टेज लावणारे जमतात. हे देखील सगळे व्हॉलंटीयर्सच असतात. आपला सुट्टीचा दिवस मदतीसाठी आलेले. काही लोकांना अनुभव असतो काही अगदी नवशिके असतात. पण उत्साहाने घरचे कार्य असल्याप्रमाणे काम करतात. कलाकार जमतात. थोडे खेळीमेळीचे वातावरण निर्माण करून ताण कमी करण्याचे प्रयन चालू होतात. मेकपला सुरवात होते. कोण किती माकडासारखे दिसते याची चढाओढ सुरु होते. मग सगळे स्टेजवर जमतात. त्या प्रकाशात मेकप कसा दिसतो, किती 'रंगवावे' लागेल याचा अंदाज घेऊन उरलेला मेकप पूर्ण केला जातो.

पहिल्या अंकाच्या पहिल्या प्रयोगाचे कपडे घालून कलाकार तयार होतात. तोवर सेट लागलेला असतो. नटराजाची पूजा होते. नारळ वाढवला जातो आणि सगळे कलाकार आपापल्या पोझिशन्स लक्षात घेउन तयार रहातात. लाईट्स आणि ऑडिओ सांभाळणारे आपापल्या जागी तयार असतात. पडद्यामागचे कलाकार आपापल्या विंगा सांभाळतात. कॉमवरचा माणूस तयार होतो.

हे सगळे चालू असताना प्रेक्षक येतात. नाटक सुरु होण्याआधीच्या तीनही घंटा होतात. तिसऱ्या घंटेनंतर नाटकाची अनाऊन्समेंट होते. पडदा वर जातो नाटक सुरु होते. प्रवेशाप्रमाणे कपडे बदलणे, मेकप टचप करणे, सेट बदलणे हे चालूच असते. प्रेक्षकांचा अंदाज घेत नाटकाचा पहिला अंक संपतो. प्रेक्षक चहा-बटाटेवड्याचा आस्वाद घ्यायला जातात तेव्हा कलाकार पटकन काहीतरी तोंडात टाकून पुढच्या अंकाची तयारी करतात. सेट बदलायचा असेल तर ते काम संपवले जाते. सगळे पुढच्या अंकासाठी सज्ज होतात. तिसऱ्या घंटेनंतर प्रेक्षक येऊन बसल्यावर पुढचा अंक सुरु होतो.

नाटक संपते, पडद्यामागच्या, स्टेजवरच्या कलाकारांची सर्वांना ओळख करुन दिली जाते. प्रेक्षक घरी जायला निघतात पण पडद्यामागच्या कलाकारांचे काम अजून संपलेले नसते. उभा केलेला सर्व सेट मोकळा करुन परत गोडावूनमधे टाकण्यासाठी ट्रक्समधे भरला जातो. प्रेक्षकांकडून कलाकारांचे होणारे कौतुक पहात हे पडद्यामागील कलाकार आपापली कामे करत असतात. थोड्याच अवधीत सगळे रिकामे होते. गाड्या भरतात. निर्मात्याने सोय केलेली असेल त्याठिकाणी सगळे तंत्रज्ञ, कलाकार जेवणासाठी जमतात. मग कोठे काय चुकले, काय छान झाले, पुन्हा प्रयोग झाला तर काय सुधारणा करु शकतो याचा उहापोह होतो. जेवणाच्या कार्यक्रमानंतर सगळे पांगतात. ५-६ महिने चाललेला गोंधळ संपतो. पुढच्या शनिवारी-रविवारी तालमी नसल्यामुळे कदाचीत रिकामे वाटते पण त्यावेळी काहीतरी चुकल्या चुकल्यासारखे होते.

वेगळ्या गावी प्रयोग करायचा असेल तर याला अजून एक वेगळे वळण येते. प्रत्येक कलाकार आणि ज्या तंत्रज्ञांना जमते ते सर्व आपापल्या खर्चाने प्रयोगाच्या ठिकाणी जातात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे १०-११ एप्रिल २०१०ला झालेली एकांकिका स्पर्धा. एकूण बारा एकांकिका सादर करण्यात आल्या. त्या एकांकिमेधील सर्व कलाकारांचे संच अमेरिकेतील वेगवेगळ्या ठिकाणांहून शिकागोला जमले होते. दोनपात्री ते जवळपास १०-१२ कलाकार असलेल्या या एकांकिका पहाताना त्यांचे कष्ट दिसत होते. नविन जागा, पडद्यामागचे कलाकार माहिती नाहीत असे सगळे असूनही उत्साहाने लोक येतात आणि आपापल्या कला सादर करुन जातात. यात जाणवतो तो त्यांचा उत्साह.

नाटक म्हणजे मराठी माणसाचा आत्मा आहे असे म्हणले जाते आणि नाटकांमधे काम करणारे, पहायला येणारे आणि मदत करणारे सगळे लोक पाहिले की ते किती खरे आहे याचा प्रत्यय येतो. येवढे कलाकार स्वखर्चाने कित्येक मैलांचा प्रवास करुन लोकांपुढे कला सादर करायला तयार असतात यातच सर्व आले. काहींना बक्षिसे मिळाली. काहींच्या खांद्यावर प्रेक्षकांकडून, परिक्षकांकडून कौतुकाची थाप पडली पण आनंद सगळ्यांनाच मिळाला.
आता हे सर्व अगदी असेच होते का? तर नाटका-नाटकाप्रमाणे थोडेफार बदल होतात पण एकून ढाचा असाच. कधी कधी एखाद्या कलाकाराचा सुप्त गुण कळतो. कधीकधी अचानक एखादा स्टेजच्यामागे मन लावून काम करणारा कलाकार सापडतो. दिग्दर्शक कसे विचार करतात, त्यांनी प्रेक्षकांची नस कितपत ओळखलेली असते हे कळते. त्यांची विषयावरची पकड जाणवते. सुदैवाने मला खरोखर चांगल्या दिग्दर्शकांचे काम बघायची संधी मिळाली. स्वतःला मुख्य भूमिका करायला मिळावी म्हणून दिग्दर्शन करणारेही असतात असे ऐकले आहे पण सुदैवाने पाहिले नाहीये.
आता यात माझा सहभाग किती आणि कोणता? तर आमच्या घरी तालमी असतील तर सर्वांना चहा करुन देणे. आणि कधीमधी त्यांच्या खाण्यासाठी काहीतरी करणे. नाटकाच्यादिवशी पडेल ती मदत करणे. संधी मिळाली तर मेकप करणे, कपडेपट सांभाळणे.

आणि सगळ्यात महत्वाचे म्हणजे
नवरा कलाकार/निर्माता/दिग्दर्शक/पडद्यामागचा कलाकार काहीही असला तरी त्याला जमेल तशी मदत करणे.

vadanikaval@gmail.com

# अविरत झुंज......

विश्वजीत दीपक गुडधे

तिचं नाव सावित्री. समुद्रकिनाऱ्यालगत वसलेलं तिचं गाव. कष्टांविना तिचा दिवस मावळला, असं कधी झालंच नाही. दिवस उजाडल्यापासून निजेपर्यंत केवळ कष्ट आणि कष्ट करणेच तिच्या नशिबी होते. निजताना स्वतःच्या तर नाहीच पण निदान लेकरांच्या पोटात तरी दोन घास राहतील याची शाश्वतीही नव्हती. हसणे, आनंदी राहणे यांसारख्या गोष्टींपासून ती कोसो दूर होती. पण म्हणून तिने परिस्थितीपुढे नांगी टाकलेली नव्हती. संकटांना सामोरे जाऊन प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्याची जिद्द तिच्यात होती. कदाचित या जिद्दीनेच तिला जीवन जगण्याची प्रेरणा दिली.

तिच्या कष्टांत आणखी भर म्हणजे तिचा दारुडा नवरा. चोवीस तास दारूत झिंगलेला. रोज तो व त्याच्यासारखेच त्याचे काही व्यसनी मित्र त्याच्या घरी जमायचे आणि रात्री उशिरापर्यंत त्यांचे हे 'स्नेहसंमेलन' चालू राहायचे. तिच्या नवऱ्याला एकच काम माहित होते : 'ओली पार्टी'. त्यामुळे तिच्या ऐतखाऊ नवऱ्याचा व संपूर्ण कुटुंबाच्या पोषणाचा भार तिच्या एकटीच्याच खांद्यावर. सकाळी समुद्रकिनाऱ्यावर जाऊन ती मासे पकडायची आणि बाजारपेठेत विकायला न्यायची. पुरेसे मासे विकल्या गेले तर ठीक नाहीतर उपाशी राहायची वेळ यायची.

थकली-भागलेली ती संध्याकाळी उशिरा घरी परतायची. तिच्या भरवशावर घरची चूल पेटायची. मासे विकून मिळालेल्या पैशांतील काही पैशांची ती बचत करायची. नवऱ्याचा दारूचा शौकही तिच्याच पैशांतून चालायचा. तिची पैसे देण्याची इच्छा नसूनही नवऱ्याच्या अत्याचारामुळे तिला नाईलाजाने पैसे द्यावे लागत. एखाद्या वेळेस पैसे देण्यास तिने नकार दिला तर नवऱ्याकडून मारहाण आणि शिव्यांचा भडीमार केला जायचा. नवऱ्याच्या व्यसनापायी अनेकदा त्यांना उपाशीपोटीच झोपावे लागे. नवऱ्याने काही काम करून तिला हातभार लावावा असे तिला वाटू लागले होते. ती नवऱ्याला म्हणायची, "तुम्ही काही कामधंदा काहून नाही करत ? म्या वाचवून ठेवलेले सारे पैशे तुम्ही दारूत घालविता अन् तुमच्या दारूपायी म्हायी लेकरं उपाशी झोपतात. म्हायी नाहीतर निदान पोराईची तरी काळजी करा." पण तिच्या निर्दयी नवऱ्यावर काहीएक परिणाम व्हायचा नाही. त्यांची परिस्थिती 'जैसे थे'.

असेच एकदा मासे पकडायला गेली असताना ती विचार करू लागली, "अशीच गत राह्यली तर पुढं कसं व्हईन ? म्या जरी बुकं शिकले नाई तरी मले लेकराईले शिकवायचं हाये. शिकवून मोठ्ठा सायेब बनवायचं हाये. ते जर शिकले न्हाई तर आज जशी म्हाई स्थिती आहे तशीच तेईची पण व्हईन...नाय, नाय, काही झाले तरी म्या लेकराईले शिकवणार." आणि ती नवऱ्याच्या व्यसनाला आवर कसा घालावा याबाबत विचार करू लागली. आता जर काही केले नाही तर वेळ हातून चालली जाईल. मुलांच्या भवितव्याबद्दल तिला हुरहुर वाटू लागली. नवऱ्याला विरोध करण्यासाठी ती सामर्थ्य एकवटू लागली आणि तेवढ्यातच तिला तो प्रसंग आठवला.

पहिल्या अपत्याच्या वेळी सासरच्यांनी तिची गर्भलिंग निदान चाचणी करवून घेतली. होणारे अपत्य हे 'मुलगी' असल्याचे त्यांना त्यातून कळले. तेव्हा त्यांनी गर्भपात करण्यासाठी तिच्यावर खूप दबाव टाकला. त्यांना मुलगी नको होती. त्यांना 'कुलदीपक' हवा होता. समाजात स्त्रीला कायम दुय्यम स्थान का दिले जाते, हा प्रश्न तेव्हा तिला भेडसावू लागला. लक्ष्मी, दुर्गा, भवानी या देवींची भक्ती करणारा, त्यांची पूजा करणारा आणि त्यांच्या दर्शनासाठी मंदिरात रांगांच्या रांगा लावणारा (एका अर्थाने स्त्रीला उच्च दर्जा देणारा) हाच समाज कन्याजन्माच्या वेळी मात्र त्यांना मारून टाकण्याची भाषा बोलतो, या विसंगतीने तिला विचार करण्यास प्रवृत्त केले. शेवटी सावित्रीने काही झाले मुलीला जन्म द्यायचा निर्णय घेतलाच. तिने सासरच्यांना ठणकावून सांगितले की मी असे पाप मुळीच होवू देणार नाही आणि तिने सर्वांचा विरोध पत्करून मुलीला जन्म देण्याचे धाडस केले. तिच्यापुढे सासरच्यांचे काहीएक चालले नाही आणि त्यांनीसुद्धा हात टेकले.

या प्रसंगामुळे तिला एकदम स्फुरण चढले. या परिस्थितीला सामोरे जाऊन झुंज देण्याचा तिने निर्धार केला. लेकरांना खूप शिकवून मोठे करण्याचा तिने ध्यास धरला. कालांतराने नवऱ्याला पैसे देणे तीने बंद केले. त्यामुळे साहजिकच त्याची व्यसनाधीनता थोडीफार कमी होत गेली. नवऱ्याच्या संस्कारांचा मुलांवर प्रभाव पडू दिला नाही. त्यांना नेहमी त्याच्यापासून दो हात दूरच ठेवले. ती स्वतः जरी अशिक्षित असली तरी तिने शिक्षणाचे महत्व ओळखले होते. केवळ ज्ञानच आपल्याला आपला हक्क मिळवून देतो, हा विचार तिने तिच्या मुलांच्या मनावरही बिंबवला. मुलांच्या शिक्षणाकरिता पैसे कमी पडू नयेत म्हणून ती अन्य काही कामेही करू लागली. तिने शिवणकाम सुरु केले.

"किती बी त्रास झाला तर चालंल पन लेकराईच्या शिक्षणाले एक पैका बी कमी नाही पडला पाहिजे" असा तिचा आग्रह होता. मुलांनादेखील तिच्या कष्टांची जाण होती. त्यामुळे मुलांनीदेखील तिचे स्वप्न साकार केले. घरच्यांचा विरोध पत्करून तिने ज्या मुलीला जन्म दिला होता तिने कलेक्टर होवून तिची मान उंचावली. तर तिचा मुलगाही मोठ्या पदावर नोकरीस लागला. तिच्या मुलांनी तिच्या श्रमांचे चीज केले.

एका सत्कार समारंभात सावित्रीची मुलगी म्हणाली, "माझ्या आईने आयुष्यातील समस्यांपुढे हतबल न होता ती निर्भयतेने त्यांना सामोरे गेली. तिने संकटांशी अविरतपणे एकाकी झुंज दिली आणि त्यात ती यशस्वीदेखील झाली. तिच्यापुढे अडचणींचा काहीएक निभाव लागला नाही. स्त्री ही अबला नसून ती आपल्या कर्तृत्वाने कोणतेही ध्येय गाठू शकते हे तिने जगाला दाखवून दिले आहे. ती आमच्यासाठी एक प्रेरणास्त्रोत आहे. आज मी जिथे कुठे आहे ते केवळ तिच्यामुळेच. त्यामुळे मी देवाची शतशः आभारी आहे की त्याने मला अशी आई दिली." मुलीचे आपल्याबद्दलचे हे गौरवोद्गार ऐकून सावित्रीचे डोळे पाणावले. आपल्या आयुष्याचे सार्थक झाल्याचे समाधान तिच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होते

vishwajeetgudadhe@gmail.com

# इनिस्पेकशन

प्रिया चितळे.

इयत्ता चवतीचा वर्ग. मास्तर येक डोला दरवाज्याकड लावुन शिकवत होते. ईंन्स्पेक्टर आले. शिकवल्याप्रमान पोर ऊटली.

'येक सात नम~~~~स्ते'

'बसा बसा मुलांनो.' ईंन्स्पेक्टर म्हनला.
'मास्तर, तूमच्या वर्गातल्या सगळ्यात हुशार मूलाला ऊभ करा. मी त्याला गणीतातील काही प्रश्न विचारतो.'
'मिथन्या ऊट. ' मास्तर.
मी ऊबा रायलो. ४७ मार्क झेऊन सामाईत पयला आल्तो बोल.
'१७ गुणिले ८ कीती होतात ?' ईंन्स्पेक्टरन ईचारल.
'अं ...अं ...' माजी हातभर फाटली.
मना त १० परयंतच पाडे येत वते.
'येकशे चालीस ' मी ठोकल.
'एकशे चाळिस ? मास्तर हा तुमच्या वरगातला सगळ्यात हुशार मुलगा ना? हा चक्क एकशे चाळिस सांगतो.?'ईंन्स्पेक्टर आवाक झाल्ता.
'सर आवो हा मिथन्या हूशारच हाय. बाकीची सगली पोर दीडशे च्या वर सांगतान.'
ईंन्स्पेक्टर पयली चक्कर आली.
ईंन्स्पेक्टरच आ केलेल तोंड बंद नाय झाल तवर मास्तरनी ईचार ल 'सर मूलांनी महात्मा गांधीजींवर भाषण तयारकेलय. म्हणायला सांगू?'
'सांगा.' ईंन्स्पेक्टरन तोंड मिटल.
'चंद्रकांत ऊट. भाषण कर.' मास्तर न आदेश दिला.
चंद्या ऊटला न भाशनाला सुरवात केली.
'मत्मा गांधी च पुर्न नाव मोहनदास करमचंद गांधी.
२ आक्टोबर ला पोरबंदर हीत गांधीजीचा जन्म झाला.
गांधीजीचे बालपन खुपच गरीबीत गेले.
ल्हानपनी येकदा त्यांनी वडलांच्या खिच्यातून पैशे चोरले. तेसमज ल्यावर वडलांनी त्यांना आवरा मारला आवरामारला क आयूक्शान त्यांनी परत कंदीबी चोरी केली न्हाई.

आपले शालेतील शिक्शन पुर्न करुन ते विलायतेला गेले.तीते त्यानी वकीलीच शिक्शन झेतल. आनी ते भारतातपरत आले.
भारतात त्यांनी वकीलीचा व्यवसाय चालू केला. पन तो काय चाल्ला नाय मग ते आफ्रिकेत गेले. तीते त्यांनीवकीलीचा व्यवसाय चालू केला. पन तो बी काय चाल्ला नाय मग ते भारतात परत आले.
काय करावे या विवंचनेत आस्ताना यकदा त्यांनी सत्याग्रह केला. तो चाल्ला.
मग त्यांनी यकापाटोपाट येक आशे भरपुर सत्याग्रह केले व थोड्याच दिवसात आक्क्या भारतात लोकप्रिय झाले.'
ईन्स्पेक्टरला पुडच कायव आयकायला गेल नाय. तो आरवा झाल्ता.

By
Priya Chitale.
E-mail Member of Esahity Pratishthan

.priya.chitale@stfc.co.in




इत्यर्थच्या जानेवारी अंकाची तयारी सुरू आहे.
नव्या वर्षात नव्या जोमाने नवे संकल्प सिद्ध करायचे आहेत.
स्वतःपासून स्वतःपर्यंतच्या प्रवासाची इत्यर्थला नवी सुरुवात करायची आहे..

So...

जानेवारी २०१३ च्या अंकाची थीम आहे **“सुरुवात”**

आपलं लेखन या अंकासाठी लवकरात लवकर etyarth.esahity@gmail.com
व्र ईमेल करा किंवा संपर्क करा esahity@gmail.com वर.

इत्यर्थचे आजवरचे सारेच अंक आता ऑनलाईन वाचता येतील
etyarth.blogspot.in वर!!

# ई साहित्य प्रतिष्ठान

## बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

इत्यर्थचा हा अंक कसा वाटला? छान आहे ना? तुम्ही आम्हाला सांगितलं तरच आम्हाला कळेल ना! तुमच्यासाठी एवढं पानंच्यापानं लिहिणाऱ्या त्या लेखक लेखिकेला, तुम्ही काही ना काही कळवलंच नाहीत तर त्या पुढचं पुस्तक तुम्हाला कसं देणार? एक ई मेल तर पाठवायची. किंवा एक फोन. हे लेखक, हे डिझायनर्स मराठी भाषेवरच्या प्रेमाने हे सगळं काम विनामूल्य कर्त असतात आणि म्हणून इतकं सुंदर साहित्य इतक्या सुंदर पुस्तकात तुमच्या पर्यंत पोहोचवू शकतो आम्ही. त्यांच्यासाठी तुम्ही दोन शब्द सांगणार ना?
मोबाईल/इंटरनेटमुळे कधी नाही इतकं जग जवळ आलं. अत्यंत कमी खर्चात ई पुस्तकं बनवता येऊ लागली आणि लाखो वाचकांपर्यंत वितरण करणं शक्य झालं. त्यामुळे नवनवीन लेखकांसाठी एक व्यासपीठ उभं झालं. आणि वाचकांना प्रतिक्रिया देणंही सोपं झालं.
मराठी भाषेत किती तरी प्रतिभावान व्यक्ती साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या असतात. कधी कधी त्यांना योग्यवेळी माती खत पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. खत-पाणी म्हणजे वाचकांच्या प्रतिक्रिया, पत्रं, मतं, शाबासकी, दाद.
दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना नवीन पुस्तकं मिळत नाहीत. प्रयोग परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही.

अशा वेळी ई साहित्य प्रतिष्ठानने नवीन साहित्यिकांसाठी ई पुस्तकांचे व्यासपीठ उभे केले. आणि लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरित करायला सुरूवात केली.
चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. कथा, कादंबऱ्या, कविता, प्रवासवर्णने सर्वकाही सव्वा लाख वाचकांपर्यंत विनामूल्य पोहोचत असतं. चारशेहून अधिक नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर झाले. त्यातील अनेकजण आज यशस्वी लेखक होताना दिसत आहेत. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ पुढे जात आहे. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद, स्त्रियांवरील अत्याचार अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य पुढे येत आहे. विनोद, बालसाहित्य, शास्त्रीय संगीत, किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिका, मराठमोळा इतिहास असे सर्व काही ई साहित्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचते आहे. "जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी" ही चळवळ आपण पहात आहातच.

सव्वा लाख रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला?
मग त्यासाठी आपली मदत हवी दोस्तांनो.
फ़ार काही नाही बंधो. एकही पैसा नका देऊ. वेळही नका दवडू. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी वाचावे अशी तुमची इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार? बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला या पुढची ई पुस्तके सर्वात आधी मिळतील. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल. होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?
आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.
खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

ई साहित्य प्रतिष्ठान